(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# महात्मा गांधी यांचा शिक्षण विषयक दृष्टिकोन आणि मुलोद्योगी शिक्षण

**श्री. राजेश शंकर अवतार** एम. ए.(मराठी, अर्थशास्त्र), एम्. एड्. सेट (मराठी) अधिव्याख्याता, ताराराणी विद्यापीठ, ज्युनि. कॉलेज ऑफ एज्यु. राजारामपुरी, कोल्हापूर

---

**प्रस्तावना:**

स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षणाचा सर्वांगीण विकास करून तत्कालीन शिक्षण पद्धती मध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करणाऱ्यांपैकी थोर व्यक्ती म्हणजे महात्मा गांधी हे होय. गांधीजी हे केवळ राजकीय पुढारीच नव्हते, तर त्यांनी धर्म, समाजकारण, अर्थकारण, हरिजनोद्धार, साहित्य, कला, ब्रह्मचर्य, निसर्गोपचार अशा जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत सखोल चिंतन व प्रत्यक्ष प्रयोग करून त्यांनी त्या क्षेत्रातील समस्यांवर प्रकाश टाकला आहे. मौलिक व अभिनव विचारसंपदा प्रगट केली आहे. शिक्षणाचे ही क्षेत्र अर्थातच त्यातून वगळले गेले नाही. त्यांनी शिक्षणासंबंधी विचारमंथन करून संपूर्ण देशालाच एक नवी शिक्षणयोजना दिली आहे. आज आपल्या देशाने म. गांधीजीच्या शिक्षण योजनेचा संपूर्णपणे स्विकार केला नसला तरी, त्यांच्या योजनेतील विविध भागांमध्ये बदल करून त्यातील अनेक तत्त्वे आजच्या शिक्षण व्यवस्थेने स्विकारली आहेत.

इंग्रजांनी या देशात रूढ केलेली शिक्षणव्यवस्था ही केवळ कारकून निर्माण करणे अशा प्रकारची होती, त्या शिक्षण पद्धतीचा सर्वाधिक उपयोग झाला तो केवळ इंग्रजांना, आणि म्हणूनच आपल्या देशातील विद्यार्थ्यांना त्याला त्याच्या जीवनातील विविध समस्याही सोडवू न शकणारी इंग्रजी शिक्षण व्यवस्थेला म. गांधीजी यांनी विरोध केला.

म. गांधीच्या मते शिक्षण म्हणजे मानवाचा समतोल, सर्वांगीण, सुसंवादी विकास म्हणजे शिक्षण, साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे, शिक्षण म्हणजे व्यक्तीचा सर्वांगीण विकास. शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक विकास. गांधीजींच्या मते, शिक्षण म्हणजे समाजक्रांतीचे, नवसमाज निर्मितीचे आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी साधन होय. शिक्षणातून सेवाभावी नागरिक तयार झाला तर शोषणरहित, वर्गहीन सहकार्य यावर आधारित समाज तयार होऊन 'रामराज्य' निर्माण होईल ही म. गांधीजीची दृढ भावना होती.

तत्कालीन शिक्षणात साक्षरतेवर भर दिला जात होता. त्यांच्या मते, ''केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे. शिक्षणाचा प्रारंभदेखील नव्हे; आत्मा व मन यांचा परिपूर्ण विकास करून व्यक्तीमधील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती करणे हे शिक्षणाचे खरे ध्येय होय.

**महात्मा गांधीजी आणि शैक्षणिक कार्य**

म. गांधीनी १९०४ साली दक्षिण आफ्रिकेत फिनिक्स आश्रमाची स्थापना करून आपल्या शैक्षणिक कार्याची सुरूवात केली. १९११ साली ट्रान्सवाल येथे टॉलस्टॉय आश्रमाची स्थापना करण्यात आली. आफ्रिकेतून भारतात परतल्यानंतर ते शांतिनिकेतनमध्ये गेले व नंतर भारत यात्रा केली. म. गांधीनी भारतात १९१७ साली चंपारण्य जिल्ह्यात ग्रामशिक्षणाचा प्रारंभ केला. पुढे म. गांधीजींनी १९२० साली गुजरात विद्यापीठाची स्थापना करून या विद्यापीठाला 'सा विद्या या विमुक्तये' हे ब्रीद वाक्य देऊन शिक्षणाच्या कार्याचा प्रसार केला.

म. गांधीजी ज्या वेळी भारतात आले त्यावेळी भारतात इंग्रजांच्या शिक्षण व्यवस्थेची पाळेमुळे खोलवर रूजली होती. ज्या शिक्षणाने केवळ इंग्रजांना फायदा होणार होता आणि म्हणूनच म. गांधीनी या शिक्षणव्यवस्थेचा विरोध केला, या शिक्षणव्यवस्थेत अनेक दोष होते ते पुढीलप्रमाणे:-

**प्रचलित शिक्षणपद्धतीचे दोष**

१) इंग्रजी भाषेला शिक्षणात अवास्तव महत्त्व दिले गेले.
२) पुस्तकी ज्ञानावर अधिक भर दिला जात होता.
३) शिक्षणातून उच्चशिक्षित कमी व अशिक्षित जास्त ही दरी वाढत गेली.
४) शिक्षणात मातृभाषेला गौण स्थान दिले गेले.
५) प्रचलित शिक्षण व्यवस्थेत हस्तव्यवसायाकडे दुर्लक्ष केले गेले.
६) प्रचलित शिक्षण व्यवस्था अधिक खर्चीक असल्याने सर्वदूर स्तरापर्यंत पोहोचले नाही.
७) ही शिक्षण पद्धती जीवनाशी निगडीत न राहता केवळ विषयाशी पुस्तकाशी निगडीत होती.
८) या शिक्षण व्यवस्थेत भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब नव्हते.

वरील प्रमाणे तत्कालीन शिक्षण पद्धतीत अतिशय मोठे दोष गांधीजीनी सांगितले आहेत. म. गांधीजींनी शिक्षणाच्या संकल्पनेसंदर्भात अनेक मते मांडून शिक्षणाची काही महत्त्वाची ध्येये सांगितली आहेत ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**शिक्षणाची ध्येये**

**१) श्रमप्रतिष्ठेवर आधारित शिक्षण हवे**

म. गांधीजींच्या मते, बुद्धी व श्रम यांची सांगडघालणारी समाजाच्या गरजांवर आधारित आणि उत्पादन क्षमतेला चालना देणारी शिक्षण पद्धती हवी.

**२) जीवन शिक्षणावर भर**

पाश्चात्य तत्त्वज्ञानातील निसर्गवाद, आदर्शवाद, वास्तववाद व कार्यवाद या चारही तत्त्वज्ञानाच्या पंथाचा गांधीजींच्या शैक्षणिक विचारांवर प्रभाव पडला होता. त्यांच्या मते, प्रभावी अशा सामाजिक व आर्थिक शक्तीपासून शिक्षण अलिप्त राहू शकत नाही. म्हणून जीवनाला सामोरे जाण्यास शिकवणारे शिक्षण दिले पाहिजे यालाच ते जीवन शिक्षण म्हणतात.

**३) शिक्षणातून चारित्र्यनिर्मिती व्हावी**

म. गांधीजींच्या मते, हे शिक्षणाचे सर्वांत महत्त्वाचे ध्येय आहे. जीवन–उत्कर्ष साधण्यासाठी आदर्श व मूल्यांची गरज असते.

**४) राष्ट्रीय शिक्षणावर भर**

प्रचलित शिक्षणाबद्दल गांधीजी पूर्णत: नाराज होते. ते म्हणाले होते, आमचे शिक्षण पूर्णत: विदेशी आहे. राष्ट्रीय शिक्षणाबाबत सर्व काही व्यर्थ आहे. स्वराज्य आज अगर उद्या मिळेल पण राष्ट्रीय शिक्षणावाचून ते टिकू शकणार नाही.

**५) सत्य हेच जीवनाचे सर्वोच्च ध्येय**

गांधीजींच्या जीवनाच्या तत्त्वज्ञानातील प्रमुख त्रिसूत्री म्हणजे सत्य, अहिंसा व प्रेम होय. गांधीजींच्या मतानुसार सत्य हेच शिक्षणाचे व जीवनाचे सर्वोच्च ध्येय आहे.

**६) आत्मसाक्षात्कार**

आत्मविकास ही व्यक्तीच्या जीवनातील विकासाची पहिली पायरी आहे. आत्मिक उन्नतीवर गांधींचा दृढ विश्वास होता. व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व मर्यादित न राहाता सर्वांगीण असले पाहिजे अशी प्रेरणा देणे आवश्यक असल्याचे गांधींचे मत होते.

**७) सांस्कृतिक शिक्षणावर भर**

ज्या शिक्षणातून भारतीय संस्कृतीचा आविष्कार होईल, असे सांस्कृतिक शिक्षण देणे आवश्यक आहे. संस्कृती हा शिक्षणाचा पाया असल्याने संस्कृतीविषयक जाण शिक्षणातून निर्माण झाली पाहिजे.

वरील सर्व शिक्षणाची ध्येये प्रत्यक्ष अंमलात आणून शिक्षण पद्धतीत बदल होण्यासाठी नवी देशहिताची शिक्षण योजना सुरू करणे आवश्यक आहे. याच उद्देशाने मूलोद्योगी शिक्षण व्यवस्था उदयास आली.

**मूलोद्योगी शिक्षणपद्धती**

१९३७ साली वर्धा येथे अखिल भारतीय राष्ट्रीय शिक्षण परिषद भरली होती. या परिषदेला विनोबा भावे, दादा धर्माधिकारी, नरेंद्र देव, काका कालेलकर, आर्यनायकम्, डॉ. झाकीर हुसेन, बाळासाहेब खेर इत्यादी व्यक्ती हजर होत्या. या सर्व तज्ज्ञांसमोर म. गांधी यांनी आपले शैक्षणिक विचार मांडले. या सर्व तज्ज्ञांनी एकत्र चर्चा करून गांधीजींनी मांडलेल्या विचारसरणीच्या आधारे एक शिक्षण योजना तयार केली. त्या शिक्षण योजनेस वर्धा शिक्षण योजना किंवा मूलोद्योगी शिक्षण किंवा जीवन शिक्षण योजना अशी नावे देण्यात आली. हिंदी भाषेत तिला 'नयी तालीम' किंवा 'बुनियादी तालीम' तर इंग्रजी भाषेत 'Basic Education'या नावाने संबोधले गेले.

मूलोद्योगी शिक्षण योजना आखण्यासाठी डॉ. झाकीर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली. त्या समितीने मूलोद्योगी शिक्षण अभ्यासक्रमात कोणकोणते विषय निवडावेत? मूलोद्योगी व्यवसाय कोणते निवडावेत? इतर विषय कोणते असावेत? यावर शाळेसाठी किती खर्च करावा? एकंदरीत विद्यार्थ्यांना शारीरिक, बौद्धिक, मानसिक, नैतिक शिक्षण कसे द्यावे? याबद्दल शिफारशी केल्या आहेत.

**मूलोद्योगी शिक्षण योजनेची वैशिष्ट्ये**

१) शिक्षण ७–१४ या वयोमर्यादेतील विद्यार्थ्यांना सक्तीचे व नि:शुल्क असावे.

२) शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा असावे. या पद्धतीनुसार देण्यात येणाऱ्या शिक्षणाचे माध्यम प्रामुख्याने मातृभाषा

असावे.

३) एखादा हस्तव्यवसाय हे शिक्षणाचे केंद्र मानून त्यातून सर्व विषय शिकवण्यात यावेत.

४) शिक्षण हे स्वाश्रयी (Self-Supporting)असावे. विद्यार्थ्यांनी निर्माण केलेल्या वस्तू विकून त्यातून जो पैसा येईल त्याच्याद्वारे शाळेचा अंशत: खर्च शिक्षकांचा पगार भागवावा.

वरील वैशिष्ट्यांपैकी दोन वैशिष्ट्ये विवाद्य ठरली ती पुढीलप्रमाणे:-

**अ) मूलोद्योगातून शिक्षण**

शिक्षणात हस्तव्यवसाय किंवा एखाद्या उद्योग हा केवळ एक प्रमुख विषयच असावा असे नव्हे तर ते शिक्षणाचे माध्यम असावे असे गांधीजींनी म्हटले आहे. या व्यवसायालाच ते मूलोद्योग असे म्हणतात. हा मूलोद्योग त्या-त्या प्रदेशातील जीवनाशी संबंधित असावा. तेथील भौगोलिक व सामाजिक जीवनाचे प्रतिनिधित्त्व करणारा असावा. मूलोद्योगाचा अंतर्भाव गांधीजींनी दोन उद्देशांनी केला. एक तर त्या द्वारे विद्यार्थ्यांच्या क्रियाशीलतेला चालना देऊन त्यांच्या मानसिक शक्तींचा विकास घडवून आणावा. दुसरा उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा जीवनाशी संबंध जोडणे ते जीवनोपयोगी होईल असा प्रयत्न करणे. एकूण गांधीजींनी शिक्षणाला पुस्तके व वर्गाच्या चार भिंती या कृत्रिम वातावरणाच्या कोंडीतून बाहेर काढून त्याला जीवनाभिमुख करण्याचा व त्यात कृतिद्वारा चैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**ब) स्वाश्रयी शिक्षण**

मूलोद्योगी पद्धतीमधील बरेच विवाद्य ठरलेले वैशिष्ट्य म्हणजे स्वाश्रयी शिक्षण. शिक्षण हे स्वाश्रयी व्हावे ही गांधीजींची अपेक्षा. विद्यार्थी शाळेत ज्या वस्तू तयार करतील किंवा जे उत्पादन करतील त्या विकणे व त्यांच्या विक्रीतून शिक्षकांचा पगार व शाळेचा खर्च भागविणे. या दृष्टीने प्रत्येक मूलोद्योगी शाळा ही स्वाश्रयी असावी असे गांधीजींचे मत होते. हे तत्त्वच या पद्धतीचे खरे मर्म आहे. गांधीजींच्या या मुद्यावर शिक्षण क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात अनुकूल व प्रतिकूल टीका झाली. विविध प्रकारचे आक्षेप घेण्यात आले. टीकाकारांच्या मते या तत्त्वाची अंमलबजावणी अव्यवहार्य आहे. विद्यार्थ्यांनी निर्माण केलेल्या वस्तू बाजारात मिळणाऱ्या वस्तू इतक्या सुबक व दर्जेदार राहू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या विक्रीची देखील आपण अपेक्षा करणे चुकीचे आहे. शिवाय विद्यार्थ्यांच्या उत्पादनातून शाळेचा खर्च भागवण्यासाठी विद्यार्थ्यांकडून जास्तीत जास्त उत्पादन करवून घेण्याचा प्रयत्न शिक्षकांकडून होईल. विद्यार्थ्यांकडून जादा काम करून घेऊन त्यांची पिळवणूक होईल व हे अतिशय विद्यार्थ्यांच्या मानसिक व शारीरिक विकासाला विघातक ठरतील.

याबाबत गांधीजींची भूमिका लक्षात घेणे आवश्यक आहे. गांधीजी म्हणतात, ‘‘स्वाश्रयीपणाचे तत्त्व ही केवळ एक प्राथमिक गरज नव्हे तर ती अत्यावश्यक अट आहे. याचा अर्थ असा नव्हे की, मूलोद्योगी शिक्षण हे प्रारंभापासूनच स्वाश्रयी बनेल. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा एकूण सात वर्षांचा कालखंड ध्यानात घेता या काळात विद्यार्थ्यांप्रीत्यर्थ झालेला खर्च व त्यांच्याकडून झालेल्या उत्पादनातून प्राप्त झालेले उत्पन्न यांचा मेळ बसावा ही माझी अपेक्षा आहे. हे जर होऊ शकले नाही तर सात वर्षे शिक्षण घेतल्यावरही विद्यार्थ्यांमध्ये पुरेशा उत्पादनक्षमतेचा विकास होऊ शकला नाही व ते स्वावलंबी होऊ शकले नाहीत असेच म्हणावे लागेल व मूलोद्योगी शिक्षणपद्धतीचे मूळ उद्दिष्टच विफल होईल. ‘‘स्वाश्रयी नसलेले मूलोद्योगी शिक्षण म्हणजे निर्जीव कलेवर.’’ शेवटी या गोष्टीवर झाकीर हुसेन, सैय्यादिन, बाळासाहेब खेर आदी शिक्षणशास्त्रज्ञांत बरीच चर्चा होऊन ही योजना उत्पादनाची योजना नसून ती शिक्षणाचीच योजना आहे असे नि:संदिग्ध घोषित करण्यात आले व गांधीजींची उत्पादनाची अट दुय्यम प्रकारची करण्यात येऊन ती आवश्यक अट असू नये असे ठरविले गेले.

**मूलोद्योगी शिक्षण पद्धतीचे यशापयश**

स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसची मंत्रिमंडळे असताना त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळातही अनेक प्रांतात मूलोद्योगी शिक्षणयोजना लागू होती. मूलोद्योगी शाळेतून उत्पादन किती प्रमाणात होऊ शकते, त्यातून शाळेचा खर्च किती प्रमाणात भागतो यासंबंधी प्रयोगही झाले. मूळ योजनेत काही फेरबदलही करून तिचा अवलंब करण्यात आला. परंतु दुर्दैवाने ही योजना फारशी यशस्वी ठरू शकली नाही. याची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे:-

१) शिक्षण क्षेत्रातील अधिकारी व समाज यांनी मूलोद्योग पद्धतीची मूळ कल्पना नीट समजून घेऊन त्यातील योग्य तत्त्वांचा स्वीकार केला नाही. केवळ गांधीजींच्या आग्रहाखातर राबविण्याचा देखावा निर्माण केला.

२) प्राथमिक शाळेचे मूलोद्योगी शाळेत सुयोग्य रूपांतर करण्याच्या व्यवस्थित योजना आखल्या नाहीत.

३) स्थानिक गरजांनुसार विविध प्रकारचे हस्तव्यवसाय शिकविण्याऐवजी केवळ सूतकताई, विणकाम हेच व्यवसाय शिकविले गेले.

४) मूलोद्योगी पद्धती शासनाने नियुक्त केली म्हणूनच ती रूढ झाली. तिची केवळ यांत्रिक अंमलबजावणी करण्यात आली.

५) अपात्र व अकार्यक्षम शिक्षकांच्या हातात ती सोपविण्यात आली.

६) ही योजना ग्रामीण भागापुरती मर्यादित आहे असा गैरसमज निर्माण झाला.

७) मूलोद्योगी शिक्षणातून उत्पादित वस्तूंचा दर्जा कमी प्रतीचा असल्यामुळे विक्री करण्यासाठी समस्या येऊ लागल्या.

८) या योजनेवर कोणाचीच फारशी श्रद्धा नव्हती. ना पुढाऱ्यांची, ना अधिकाऱ्यांची, ना शिक्षकांची! ती योजना गांधीजींची होती म्हणूनच, केवळ एक नैतिक कर्तव्य मानून तिचा अवलंब करण्यात आला.

**गांधीजींचे श्रेष्ठत्त्व**

मूलोद्योगी शिक्षण पद्धतीचे वास्तव निराशाजनक असले तरी कोठारी शिक्षण आयोगाने उद्योग व श्रमप्रतिष्ठांचा आपल्या शिफारशींमध्ये उल्लेख करून शालेय अभ्यासक्रमात कार्यानुभव विषयाचा समावेश केला. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात स्पष्ट उल्लेख करताना म्हटले आहे की, आजच्या युगाची आव्हाने पेलण्यासाठी, स्थानिक नियोजनावर अंमलबजावणी करण्यासाठी, ग्रामीण विद्यापीठांची नवीन रूपरेषा निश्चित करण्यासाठी व त्यांचा विकास करण्यासाठी म. गांधींची शिक्षणविषयक क्रांतिकारी योजना महत्त्वपूर्ण भूमिका बजावते आहे. मूलोद्योगी पद्धतीमधील अनेक कल्पना देखील आपण स्वीकारल्या आहेत. उदा. कृतीतून शिक्षण, व्यवसायाला महत्त्व, समवायपद्धती या तत्त्वांना आपल्या देशातील शैक्षणिक पुनर्रचनेत महत्त्वाचे स्थान दिले जात आहे. गांधीजींनी स्वाश्रयी पणाच्या तत्त्वाचा केलेला पुरस्कार तत्कालीन परिस्थिती आवश्यक होता. देशातील आर्थिक परिस्थिती, पारतंत्र्यात राज्यकर्त्यांची शिक्षणाबाबतची अनास्था व देशातील निरक्षरतेचे प्रचंड प्रमाण, खेड्यातील निरक्षर जनता, त्यांना पुस्तकी शिक्षण देण्याऐवजी चरितार्थाचे, उत्पादनाचे शिक्षण अधिक गरजेचे होते त्यामुळे गांधीजींनी त्याचा पुरस्कार केला.

आज स्वातंत्र्य मिळून इतक्या वर्षातही साक्षरतेचे प्रमाण १००% झाले नाही, शाळांना इमारती नाहीत, प्रयोगशाळा नाही, ग्रंथालये नाहीत, क्रीडांगणे नाहीत, हजारो खेड्यांमध्ये एकशिक्षकी शाळा आहेत. शिक्षकांना अजूनही पुरेसे वेतनमान नाही. अनेक सुधारणांच्या योजना व आयोगांच्या शिफारशी पैशाच्या अभावी थंड्या बस्त्यात पडून आहेत. ही आजची परिस्थिती! मग स्वातंत्र्यपूर्व काळात काय अवस्था असेल हे बोलावयासच नको. अशा परिस्थितीत आर्थिक अडचणीतून मार्ग काढण्यासाठी जो उपाय गांधीजींनी सुचविला त्यात शैक्षणिक दृष्टीने काही उणिवा असल्या तरी त्यांचे व्यवहार चातुर्य व दूरदृष्टीय दिसून येते. आपल्या देशातील शैक्षणिक सुधारणेला खरी गती गांधीजींनी दिली. शिक्षणाला पुस्तकी अभ्यासक्रमाच्या जोखडातून बाहेर काढून त्याला कृतीची व व्यावसायिक शिक्षणाची जोड देऊन जीवनाभिमुख व समाजाभिमुख करण्याचे, शिक्षणात श्रमप्रतिष्ठेला प्रतिष्ठा प्राप्त करून देऊन श्रमजीवी व बुद्धिजीवी वर्गातील अंतर दूर करण्याचे व गोंधळलेल्या, हताश व हतबुद्ध झालेल्या शिक्षण क्षेत्रातील अनेक भारतीय विचारवंतांना मार्गदर्शन देऊन विचारप्रवण व कार्यप्रवण करण्याचे श्रेय गांधीजींनाच द्यावे लागेल. ही शिक्षण योजना म्हणजे गांधीजींनी शिक्षण क्षेत्राला दिलेली एक अनमोल देन आहे हे निर्विवाद!

**संदर्भ ग्रंथ**

१) कुंडले, म. बा.– शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन, २५० शनिवार, पुणे.

२) राजूरकर, न.गो. – विचारयात्रा, कल्पना प्रकाशन, हैद्राबाद, प्रथम आवृत्ती, १९९९.

३) साळी, व.झा. – शालेय संस्कृती, व्यवस्थापन व नेतृत्त्व परिवर्तन, फडके प्रकाशन, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट, २०१७.

४) जाधव, शारदा, – शालेय संस्कृती, व्यवस्थापन व नेतृत्त्व परिवर्तन, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, पहिली आवृत्ती, २५ ऑगस्ट, २०१७.

५) गांधी, मोहनदास करमचंद, सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, साकेत प्रकाशन.